न्यायशाखा

जा.क्र.- ३१८३/२०२४
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय
२ रा मजला, सास्मिरा इमारत,
सास्मिरा रोड, वरळी, मुंबई-४०० ०३०.
दिनांक-२८.०६.२०२४.

**<u>परिपत्रक क्र. ६०९/२०२४ दिनांक २८.०६.२०२४</u>**

धर्मादाय संघटनेत कार्यरत सर्व अधिका-यांना डिजिटल स्वाक्षरीचे युएसबी टोकन पुरविण्यात आलेले आहेत. सर्व अधिका-यांनी न्यायिक/अर्धन्यायिक प्रकरणांत पारीत केलेल्या आदेश/निर्णयावर डिजिटल स्वाक्षरी करून तो आदेश/निर्णय धर्मादाय संघटनेच्या संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे. निम्नस्वाक्षरीकार यांच्या निदर्शनास असे आले आहे की, अनेक अधिकारी पारीत केलेल्या आदेश/निर्णयावर आपली डिजिटल स्वाक्षरी करत नाहीत किंवा ते संकेतस्थळावर अपलोड करत नाहीत. त्यामुळे पक्षकार किंवा वकिलांना आवश्यकता नसतांनाही सदर आदेश/निर्णय यांच्या प्रमाणित प्रती घेणे भाग पडत आहे. त्यामुळे विनाकारण प्रमाणित प्रती विभागावर अतिरिक्त ताण येवून तक्रारींमध्ये भर पडत आहे. सदर प्रकार टाळण्यासाठी व धर्मादाय संघटनेच्या कामात सुसुत्रता येण्यासाठी सर्व अधिका-यांनी न्यायिक/अर्धन्यायिक प्रकरणांत पारीत केलेल्या आदेश/निर्णयावर डिजिटल स्वाक्षरी करून तो आदेश/निर्णय पारीत केल्यापासून तीन दिवसांत धर्मादाय संघटनेच्या संकेतस्थळावर अपलोड करावेत.

सदर परिपत्रकाचे सर्व अधिका-यांनी काटेकोरपणे पालन करावे.

28/06/24
(अमोघ श्या. कलोती)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-

१.परिपत्रक धारिणी

२. सर्व संबंधित अधिकारी

३.संगणक शाखा(संकेतस्थळावर नोंदीसाठी)